सन २००५-०६ साली पुराने बाधित झालेल्या गावांचे सर्वेक्षण करणे, ट्रायल पीट घेणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे इ. कामांचे देयक अदा करण्यासाठी निधी मंजूरीबाबत...

महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः आव्यप्र-२०१८/प्र.क्र.०३/र-१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५/०३/२०१९

वाचा :- (१) सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक, भुकंप पुनर्वसन क्र.४, लातूर यांचे पत्र क्र.एघभूपु/ताशा/१११, दि.७/७/२०१२

(२) अधिक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.अअ/मुंम/प्रशा/इशवि/३४२०, दि.९.४.२०१४

(३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.आव्यप्र-२०१८/प्र.क्र.०३/र-१२, दि.५.१०.२०१८

(४) सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक (भू.पु.) क्र.४, लातूर यांचे पत्र क्र.एघभूपु-४/तांशा/१००/२०१८, दि.२६.९.२०१८

(५) महसूल व वन विभाग शासनपत्र क्र.आव्यप्र-२०१८/प्र.क्र.०३/र-१२, दि.३.११.२०१८

(६) सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक (भू.पु.) क्र.४, लातूर यांचे पत्र क्र.एघभूपु-४/तांशा/१४३/२०१८, दि.११.१२.२०१८

**प्रस्तावना -**

सन २००५-०६ साली पुराने बाधित झालेल्या गावांचे सर्वेक्षण करणे, ट्रायल पीट घेणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे इ.कामांसाठी कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (भू.पु.) क्र.४, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांचेकडून दि.२४.२.२००८ रोजी निविदा प्रसिध्दीस देण्यात आली. दि.२७.३.२००८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. कंत्राटदारांनी केलेल्या कामांच्या देयके अदा करण्यासाठी रुपये ४९,४६,६६३/- मागणी करण्यात आली होती. त्यापैकी संदर्भ क्र.३ येथील दि.५.१०.२०१८ च्या आदेशान्वये, ५०% रक्कम रुपये २४,७३,३३२/- अदा करण्यास शासन मंजुरी देण्यात आली आहे. देयकाची उर्वरित रक्कम अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २००५-०६ साली पुराने बाधित झालेल्या गावांचे सर्वेक्षण करणे, ट्रायल पीट घेणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे इ.कामांच्या देयकाच्या रकमेची कंत्राटदारांनी केलेले मागणी व कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (भू.पु.) क्र.४, लातूर यांनी दि.११.१२.२०१८ अन्वये केलेली शिफारस विचारात घेऊन, संबंधित कंत्राटदारांना देयकाची अंतिम रक्कम अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे एकूण रुपये २१,०६,८५५/- (रुपये एकवीस लक्ष सहा हजार आठशे पंचावन्न फक्त) इतका निधी अदा करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | अदा करावयाच्या देयकाची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे.अतुल ठोंबरे ॲन्ड असो., लातूर | रुपये ६,४६,५८९/- |
| २ | मे.सन ॲन्ड सन्स सेवा, लातूर | रुपये ८,२६,१०२/- |
| ३ | मे.निर्मिती कन्सल्टंट्स, लातूर | रुपये ६,३४,१६४/- |
| | **एकूण-** | **रुपये २१,०६,८५५/-** |

२. मदत व पुनर्वसन विभागाकडे शिल्लक असलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक भूकंप व पुनर्वसन क्र.४, लातूर यांना रुपये २१,०६,८५५/- रक्कम आहरित करुन धनादेशाद्वारे/ आरटीजीएसद्वारे अदा करण्याची कार्यवाही वित्तीय सल्लागार व सह सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग यांनी करावी.

३. सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक भूकंप पुनर्वसन क्र.४, लातूर यांनी संबंधित कंत्राटदारांना प्रदान करुन पुढील निधीची मागणी शासनाकडे करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५११३०२८५९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2019.03.05 11:35:24 +05'30'

**( द.शं.मुंजाळे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२
२. महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२
३. वित्तीय सल्लागार व सह सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सहाय्यक अभियंता, एकात्मिकृत घटक भूकंप व पुनर्वसन क्र.४, लातूर
५. महसूल व वन विभाग, कार्यासन आव्यप्र-६, मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवडनस्ती कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

***